(12)

OFFICE OF THE COLLECTOR BEED.

जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र ०२४४२-२२२६०४ (जमाबंदी-०१ शाखा) फॅक्स क्र. ०२४४२-२२०१

---

पहा:- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र.एलएनडी-१०९०/२१५३/प्र.क्र.२०८/ज-१, दि.१२.०२.१९९१

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमिन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१,दि.०७.०३.२००६

३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१/दिनांक २८.०५.२०१०

४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२.०७.२०११

५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०५/२०११ प्र.क्र.२० ज-१ दि [illegible]

६. महसूल व वन विभागाची अधिसुचना दिनांक ३१.१२.२०१५

७. उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्र. २०१४/जमा/कावि-५७२/जाक्र२२१३ दि.०९.१२.२०१५ व दि.०५.०३.२०१६

८. या कार्यालयाचे आदेश क्र. २०१०/मशाका/जमा-१/प्र.क्र.७०२/कावि- दिनांक. २४.०६.२०१६

९. उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्र.२०१६/जमाबंदी/कावि-/जाक्र१९५१ दि.२९.०९.२०१६.

१०. जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांचे पत्र क्र.जिरुबी/नियोजन/२३७२०-२२ दि.२७.०९.२०१६.

११. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांचे पत्र क्र.७८६/योप्रप/जनयाचिका/उपप्रापका/अंबा/१६ दि.०३.०८.२०१६.

क्रमांक २०१०/मशाका/जमा-१/प्र.क्र.७०२/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक. २०.१०.२०१६

**आदेश**

ज्या अर्थी या कार्यालयाचे आदेश क्र. २०१०/मशाका/जमा-१/प्र.क्र.७०२/कावि- दिनांक. २४.०६.२०१६ अन्वये मौजे लोखंडी सावरगांव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील स.नं./ग.नं.६३ मधील ३.२० हे.आर जमिन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,अंबाजोगाई यांचे कार्यालय इमारत बांधकामासाठी प्रचलित शासन निर्णयानुसार अटी व शर्तीस अधिन राहुन मंजुर करण्यात आली आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे पत्र दि.०३.०९.२०१६ अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र.२८/२०१३ यांचे आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई यांना कार्यालयीन इमारत,वहाने ब्रेक स्ट्रेट ट्रॅक इ.कामाकरिता या कार्यालयाचे आदेश दि.२४.०६.२०१६ अन्वये मिळालेल्या जमीनीच्या मध्ये जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांच्या ताब्यात असलेली जमीन ०.८० आर मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी त्यांचे पत्र क्र.जिरुबी/नियोजन/२३७२०-२२/१६ दि.२७.०९.२०१६ अन्वये अंबाजोगाई जि.बीड येथील १०० खाटाचे स्त्री रुग्णालय व नवजात अर्भ केंद्र यांच्या बांधकामासाठी या कार्यालयाचे आदेश क्र. आदेश क्र.२००९/मशाका/जमा-१/कावि-४३७ दि.११.०८.२००९ अन्वये स.नं./ग.नं.६३ मधील ०.८० आर मंजुर करण्यात आलेली जागा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई यांना देण्यास हरकत नाही असे कळविले आहे.

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे पत्र दि.२९.०९.२०१६ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र दि.०३.०९.२०१६ चे विनंती पत्रानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई यांना कार्यालयीन इमारत,वहाने ब्रेक स्ट्रेट ट्रॅक इ.कामाकरिता मौजे लोखंडीसावरगांव ता.अंबाजोगाई येथील स.नं./ग.नं.६३ मधील जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांचे ताब्यात असलेली ०.८० आर जागा देणेबाबत शिफारस केली आहे.

महसुल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३(४)ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासकीय जमीन आवश्यक असेल,तर अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी,जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधीत विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील अशी तरतुद आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नियम २० व ३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१५ ला व संदर्भ क्र.२,४,५,६ ला व शासन महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ ला अधिन राहुन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार यापुर्वीच प्रस्तावीत केलेली स.नं.६३ मधील ४.०० हे.आर जमीनीमधील ३.२० हे.आर जमीन या कार्यालयाचे आदेश क्र.२०१०/मशाका/जमा-१/प्र.क्र.-७०२/कावि-

जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र.०२४४२/२२२६०४ (जमाबंदी-०१ शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२०११

---

दि.२४.०६.२०१६ अन्वये मंजुर केलेली असुन त्याच स.नं. मधील उर्वरित जमीन ०.८० आर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई यांचे कार्यालय इमारत ,वहाने ब्रेक स्टेट ट्रॅक इ.कामाकरिता उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई यांना खालीलप्रमाणे आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन दर्शविण्यात आलेल्या चतु:सिमाप्रमाणे जमीन मंजुर करण्यात येत आहे. तसेच या कार्यालयाचे आदेश क्र. २००९/मशाका/जमा-१/काबि-४३७ दि.११.०८.२००९ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना मौजे लोखंडीसावरगांव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील स.नं.६३ मधील ०.८० आर जागेचा दिलेला ताबा रद्द करण्यात येत आहे.

चतु:सिमा

| | |
|---|---|
| पूर्वेस | : स.नं.५९ |
| पश्चिमेस | : ग.नं.६३ मधील उर्वरित जमीन |
| दक्षिणेस | : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांना पुर्वी दिलेली जमीन |
| उत्तरेस | : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांना पुर्वी दिलेली जमीन |

**अटी /शर्ती**

१. जमीन मंजुर केलेल्या दिनांकापासुन जमिनीच्या अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची असेल व जमिनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी संबंधीतावर राहिल.

२. उपरोक्त जमिनीची आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील वेळोवेळी केलेल्या सुधारणा व नियमानुसार करण्यात येईल.

३. मंजुर केलेल्या जमिनीपैकी काही क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे आवश्यक आहे.

४. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी.

५. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे.

६. जमिनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड यांचे पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.

७. या कार्यालयाचे आदेश क्र. २००९/मशाका/जमा-१/काबि-४३७ दि.११.०८.२००९अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना मौजे लोखंडीसावरगांव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील स.नं.६३ मधील ०.८० आर जागेचा दिलेला ताबा रद्द करण्यात येत आहे.

८. आदेशातील व अद्यावत सर्व शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधीतावर बंधनकारक राहील.

जिल्हाधिकारी बीड

**प्रतिलिपी:**

१. मा.सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर
३. उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना आवयश्क त्या कार्यवाहीस्तव.
४. तहसिलदार अंबाजोगाई यांना देवुन कळविण्यात येते की.उप अधिक्षक भुमी अभिलेख यांचे मोजणी नकाशाप्रमाणे जमिनीचा ताबा देवुन कब्जे पावती व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करावा व यापुर्वी या कार्यालयाचे आदेश क्र. २००९/मशाका/जमा-१/काबि-४३७ दि.११.०८.२००९अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना मौजे लोखंडीसावरगांव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील स.नं.६३ मधील ०.८० आर जागेचा दिलेला ताबा रद्द करणे बाबत प्रचलित शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.
५. उप अधिक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
६. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.अंबाजोगाई
७. जिल्हा-शल्यचिकित्सक,बीड

OFFICE OF THE COLLECTOR BEED
सत्यमेव जयते

जिल्हाधिकारी बीड करिता

D/jama1 2016new/jamin dene babat.

# जिल्हाधिकारी कार्यालय , बीड

दुरध्वनी क्र .०२४४२/२२२६०४ (जमाबंदी-१ शाखा) फॅक्स क्र .०२४४२/२२२०११

पहा:- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र.एलएनडी-१०९०/२१५३/प्र.क्र.२०८/ज-१, दिनांक १३/०२/१९९१,
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रं. जमिन-१०/२००५/प्र.क्रं.३८/ज-१ ,दि.०७/०३/२००६.
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र एलएनडी-१०८३/१६०९७/प्रक.९/ज-१ ,दि.२५/२/२०००
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परी. क्र जमीन ०८/२००८/प्रक.११३/ज-१,दि.२८/५/२०१०
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१ , दि.१२/७/२०११.
६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१ ,दि.२७/७/२०११.
७. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रं.२०१२/मशाका/जमिन-१/प्र.क्रं.६७ ,दि.२८/१२/२०१२
८..महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५
९. उप सचिव,ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र दि.१३.०६.२०१६
१०.कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.जमीन२०१६/प्र.क्र.२२६/ज-७ अ दि.२२ जुन,२०१६
११.उप विभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्र.२०१६/जमाबंदी/कावि-९८/जाक्र४३२ दि.२३.०२.२०१६
१२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६/मशाका/जमीन१/प्र.क्र.४० दि.०४.०७.२०१६

क्रमांक २०१६/मशाका/जमा-१/प्र.क्र./कावी-२३६
**जिल्हाधिकारी कार्यालय बीड**
दिनांक १४/०७/२०१६.

## आदेश

ज्या अर्थी उप विभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्र.२०१६/जमाबंदी/कावि-९८/जाक्र४३२ दि.२३.०२.२०१६ अन्वये पावर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड शेपवाडी ता.अंबाजोगाई यांच्या विनंती प्रमाणे मौ.धनोरा बु.अंबाजोगाई येथील शासकीय गायरान जमीन स.नं.४८४ मध्ये पावरग्रीड परळी ट्रान्समीशन लिमीटेड यांच्या ७६५/४०० के.व्ही.सबस्टेशन उभारणी करिता २७.०० हे. आर जमीन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन जमीन मंजूर करणेस शिफारस केली आहे.

मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.२०१६/मशाका/जमीन१/प्र.क्र.४० दि.०४.०७.२०१६ अन्वये महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ मधील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील पाच हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र मंजुरीसाठी मा.विभागीय आयुक्त यांचे पुर्व मान्यतेची आवश्यकता असल्याने या कार्यालयाचे पत्र दि.१८.०५.२०१६चे अनुषंगाने मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.५०३६/२०१६ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहुन पावर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड शेपवाडी ता.अंबाजोगाई यांना मौ.धनोरा बु.अंबाजोगाई येथील शासकीय गायरान जमीन स.नं.४८४ मध्ये ७६५/४०० के.व्ही.सबस्टेशन उभारणी करिता २७.०० हे. आर जमीन नियमानुसार भोगाधिकार मुल्य वसुल करुन विहीत अटी व शर्तीवर मंजुर करण्यास मान्यता दिलेली आहे.

सह दुय्यम निबंधक वर्ग-२ अंबाजोगाई यांनी त्यांचे पत्र क्र.मुल्यांकन/२०१६/११३ दि.२९/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये मौ.धनोरा बु.अंबाजोगाई येथील शासकीय गायरान जमीन स.नं.४८४ मधील २७.०० हे.आर शासकीय गायरान जमिन चे मुल्यांकन रक्कम रूपये ४,११,४४,०००/- (अक्षरी चार कोटी आकरा लक्ष चौव्वेचाळीस हजार फक्त)असल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने चलन क्रमांक GRN MH ००२६४९६६३ २०१६१७ M ग्रास प्रणाली द्वारे विहीत लेखाशिर्ष ००२९ Land revenue ८०० other receipt खाली दि.१३/०७/२०१६ रोजी जमा करुन चलनाची प्रत या कार्यालयास सादर केली आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०,३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१५ व संदर्भ क्र.८,९,१०,१२ ला आधिन राहून शासन निर्णयातील तरतूदीनुसार पावर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड ,शेपवाडी ता.अंबाजोगाई जि.बीड यांच्या विनंती प्रमाणे मौ.धनोरा बु.अंबाजोगाई येथील शासकीय गायरान जमीन स.नं.४८४ मध्ये पावरग्रीड परळी ट्रान्समीशन लिमीटेड यांच्या ७६५/४०० के.व्ही.सबस्टेशन उभारणी करिता २७.०० हे. आर जमीन खालील प्रमाणे आदेशातील अटी व शर्तीस व मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.५०३६/२०१६ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहुन दर्शविण्यात आलेल्या चतु:सिमा प्रमाणे जमीन मंजुर करण्यात येत आहे.

(कृपया मागे पहा)